**नियमित फौजदारी खटला क्र.१६४/२०१९** **निशाणी क्र. १५६**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३

मी शपथेवर कथन करतो की,

**नाव** – शिवाजी अशोक ढाकणे

**वय** – ३५ वर्षे, **व्यवसाय** – पो कॉ ब नं. १६९९

**नेमणुक** – श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

**सरतपास**
**अभियोग पक्षातर्फे सहा सहा सरकारी अभियोक्ता श्री. एस एस दराडे यांचेकडून–**

०१. दिनांक २८/०७/२०१९ रोजी मी स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर येथे कार्यरत होतो. सदर दिवशी मी, पो हे कॉ भोपळे, गव्हाणे, पो ना सोळुंके, ससाणे, गायकवाड, मासाळकर असे कार्यालयालत हजर असतांना पोलीस निरीक्षक श्री दिलीप पवार यांना गुप्त बातमीदाराकडून बातमी मिळाली की, मुंगी गावचे शिवारात, गोदावरी नदी पात्रात, बाळु हिंगे, तिर्थराज हिंगे व इतर ०९ ते १० इसम हे ट्रॅक्टर व ट्रॉलीच्या सहाय्याने शासकीय वाळु चोरुन, उपसा करुन वाहतूक करत आहेत. त्यांनी आम्हाला जाऊन कार्यवाही करण्योच तोंडी आदेश दिले. त्यानंतर आम्ही शासकीय वाहानाने शेवगाव येथे येऊन पो हे कॉ भोपळ यांनी दोन पंचांना शेवगांव बसस्थानक येथे बोलावून त्यांना बातमीतील हकीगत समजावून सांगितली व कार्यवाही करीता सोबत येण्याची विनंती केली असता पंचांनी सहमती दिली. त्यानंतर आम्ही पोलीस स्टाफ व पंच असे शासकीय वाहनाने बातमीतील नमूद ठिकाणी काही अंतरावर जाऊन थांबलो असता ०९ ते १० ट्रॅक्टर व ट्रॉली मध्ये मुंगी गावचे शिवारात, गोदावरी नदी पात्रात शासकीय वाळुची चोरुन उपसा करतांना व वाहतूक करतांना दिसले. आम्ही ठिक ८.३० वा. चे सुमारास, छापा टाकला असता ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टर घेऊन सैरावैरा पळू लागले. आम्ही ०५ ट्रॅक्टर ताब्यात घेतले असता त्यातील तीन ट्रॅक्टर वरील चालक हे पळून गेले. आम्ही त्यांचा पाठलाग केला परंतु ते मिळून आले नाहीत. पकडलेल्या दोन्ही ट्रॅक्टर चालकांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे – राजेंद्र दत्तात्रय देवढे, रा. मुंगी व त्याचे ट्रॅक्टर मालकाचे नाव अविनाश पांडुरंग मिसाळ असे सांगितले. दुसेर ट्रॅक्टर चालकाने त्याचे नाव ईक्बाल चाँद शेख, रा. मुंगी व ट्रॅक्टर मालकाचे नाव तिर्थराज हिंगे असे सांगितले. तसेच अविनाश पांडुरंग मिसाळ यांनी पळून गेलेल्या चालक व मालकांची एकूण १७ लोकांची नावे सांगितले. त्यामध्ये बाळु हिंगे, किरण काटे ही नावे आहेत.

०२. त्यानंतर पो हे कॉ भोपळे यांनी शासकीय वाळुचा व वाहनाचा जागीच पंचनामा करुन वाहने ताब्यात घेवून नमूद ईसम व वाहने घेवून पोलीस ठाणे येथे आले. पो कॉ मासाळकर यांनी फिर्याद दाखल केली. सदर ठिकाणी जे ट्रॅक्टर होते त्यांचे फोटो दाखविल्यास ओळखु शकतो. मला आता ट्रॅक्टर चे एकूण ०६ फोटोग्राफ दाखविले ते ट्रॅक्टर तेच आहेत जे आम्ही पकडले होते. सदर फोटोग्राफला एकत्रित **अर्टीकल – अ** देण्यात येते. आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो ते आज न्यायालयात हजर आहेत. तपासी अधिकारी यांनी माझा जबाब नोंदविला होता.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास**

**आरोपी क्र. ०१ ते ०५, ०९, १३, १५ व १७ तर्फे विधिज्ञ श्री. के. के. गलांडे यांचेकडूनः–**

०३ हे म्हणणे खरे आहे की, मी आज जबाब देण्यापूर्वी माझ्या जबाबातील काही मजकूर माझ्या हातावर लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर हातावरील मजकूर पाहुन मी जबाब दिला. हे म्हणणे खरे नाही की, मी हातावर मजकूर हा जबाब देण्याचे उद्देशाने लिहीला. हे म्हणणे खरे नाही की, मला जबाब आठवत नव्हता कारण मी छाप्याचे वेळी सोबत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, जबाब न्यायालयात सांगण्यास अडचण येऊ नये म्हणून हातावर लिहीला.

०४. मी कोणत्या गट क्रमांका लगत गोदावरी नदी पात्रात गेलो होते हे मला आठवत नाही. आम्ही पश्चिमेकडून नदीपात्रात गेलो होतो. मी छाप्या अगोदर नदीपात्र पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गोदावरी नदी पैठण कडून मुंगी कडे पश्चिमकडून पूर्वेकडे वाहते. हे म्हणणे खरे आहे की, गोदावरी नदीच्या दक्षिणेला व उत्तरेला जमीनी आहेत. आम्ही नदीमध्ये मुंगी गावचे बाजार तळातून उतरलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, बाजारतळावर अनेक छोटे मोठे दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, तेथे दहा पाच लोकं नेहमी बसलेले असतात. हे म्हणणे खरे नाही की, बाजारतळावरील असलेल्या लोकांपैकी कोणीही घटना पाहिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी वाळु भरत होते हे मी वरिष्ठांच्या आदेशावरुन खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की,आम्ही कोणतेही ट्रॅक्टर वाळु वाहतुक करतांना पकडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, चुकीच्या फिर्यादच्या आधारे, तपासी अंमलदार यांनी माझा चुकीचा जबाब नोंदविला. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या आदेशानुसार मी खोटा जबाब दिला.

**उर्वरित आरोपीं तर्फे विधिज्ञ श्री. एल. एच. लांडे यांचेकडून उलटतपास –**

०५. हे म्हणणे खरे आहे की, मी आताचा जबाब गुन्हयातील चालक व मालक यांचे विरुध्द

दिलेला आहे. हे मला आता आठवत नाही की, आम्हाला मुंगी गावचे शिवारात, नदी पात्रात तथाकथीत ट्रॅक्टर चोरुन वाळु उपसा करुन वाहतूक करतांना मिळून आले असे पोलीस जबाबात सांगितले होते का. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा मजकूर माझ्या पोलीस जबाबामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पोलीस जबाबातील नमूद असलेले लोकं ट्रॅक्टरमध्ये वाळु भरत होते, ते कोण भरत होते हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी स्वतः छापा टाकण्याकरीता गेलो नव्हतो त्यामुळे वाळु भरण्यासाठी कोण लोकं होते त्यांची नावे मला माहिती नाहीत.

०६. हे म्हणणे खरे आहे की, पाच ट्रॅक्टर ताब्यात घेतले त्यावेळी ते कोणाच्या मालकीचे होते हे मला माहित नव्हते.

**प्रश्न –** कोणत्या नंबरचा ट्रॅक्टर कोणता चालक चालवत होता हे तुम्हाला माहित नाही. ?

**उत्तर** ट्रॅक्टरवर नंबर नव्हते.

०७. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या रंगाचा ट्रॅक्टर कोणता चालक चालवित होता हे मला माहित नाही. मी माझ्या पोलीस जबाबात श्री भोपळे पोलीसाचे नाव सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या जबाबामध्ये भोपळे पोलीसाचे नाव नमूद नाही. हे मला आठवत नाही की, माझ्या पोलीस जबाबामध्ये भोपळे पोलीसांनी पंचनामा केला असे नमूद नाही. (सरकारी वकिलांनी सदर साक्षीदाराच्या जबाबातील मजकूर वाचून दाखविला असता त्यामध्ये पो हे कॉ भोपळे यांनी पंचनामा केला असे नमूद आहे.)

०८. हे म्हणणे खरे नाही की, शासकीय वाळुचा पंचनामा करतांना पंच हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष वाळुचे मोजमाप केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हातावर लिहीलेला मजकूर पाहुन आरोपींची नावे सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींची नावे न्यायालयात सांगण्याकरीता हातावर मजकूर लिहुन घेतला होता. मी हातावर आरोपी – एकूण १७ व राजेंद्र दत्तात्रय देवढे या आरोपीचे नाव इतका मजकूर लिहीलेला आहे.

०९. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील सांगितलेले आरोपी हे घटनास्थळी हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदर आरोपी घटनास्थळावरुन पळून गेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की आरोपींचा घटनास्थळावरील वाहने व घटनास्थळाशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सूचनेनुसार मी आरोपींची नावे पोलीसांना सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, मी वर नमूद

तारखेला छापा टाकण्याकामी गेलो नव्हतो व घटनास्थळी कोणताही छापा टाकला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी वाळु संदर्भात कोणताही गुन्हा केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सूचनेनुसार मी आरोपींविरुध्द पोलसांना जबाब दिला व आज रोजी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.03.10 10:44:30 +0530

दिनांकः ०९/०३/२०२६

(वैशाली सं. मोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०२), शेवगांव.